- प्रकरण पाचवे -

## समारोप

एकोणिसाव्या शतकातील आत्मचरित्रपर लेखनातून तत्कालीन सामाजिक सांस्कृतिक व धार्मिक परिस्थितीचे दर्शन घडते. या काळात आत्मपर लेखन केले असले तरी त्यात समाजदर्शनही अटळपणे आलेले आढळते. त्यामुळे या काळातील आत्मचरित्रपर लेखनातून, लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या अविष्काराला फारसा वाव मिळालेला दिसत नाही. आपल्या लेखनाकडे पाहण्याची या

लेखकांची वृत्तीही सामाजिक उपयुक्ततेचीच होती. एकोणिसाव्या शतकात आपल्या धर्म, संस्कृती, परंपरा, रुढी इत्यादी गोष्टीवर पाश्चात्य संस्कृतीचा परिणाम होऊन आपली संस्कृती व जीवनदृष्टी आमूलाग्र बदलू लागली. त्याचा परिणाम लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावरही होणे अपरिहार्य होते. त्यामुळे आत्मचरित्रपर लेखनातूनही या बदलत्या सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब उमटलेले दिसून येते. आत्मचरित्र हा वाङ्‌मयप्रकार व्यक्तिनिष्ठ असला तरी एकोणिसाव्या शतकातील आत्मचरित्रकारांची व्यक्तिमत्त्वे तत्कालीन सामाजिक जीवनाशी एकरुप झाली असल्यामुळे त्यांच्या लेखनही तत्कालीन सामाजिक जीवन संदर्भाशिवाय अलिप्त राहू शकले नाही.

पाश्चात्य शिक्षण आणि ख्रिस्ती मिशनऱ्यांचा प्रसार यामुळे महाराष्ट्रीय जीवनात बराच बदल होत होता. जुन्यानव्याचा संघर्ष सुरु झाला होता. स्त्रियांच्या बद्दल समाजा मध्ये सहानुभूती निर्माण होऊन विधवाविवाह, बालविवाहबंदी, बाल-जरठ विवाह बंदी इत्यादी सुधारणावादी विचार समाजात प्रसृत होऊ लागले होते. केशवपन, सती जाणे या सारख्या अनिष्ठ रुढी हळूहळू कायद्याने बंद झाल्या. ख्रिस्ती मिशनरी हिंदूधर्मावर हल्ले करीत होते. त्यातूनही आपल्या धर्मजीवनाला वेगळेवळण मिळत गेले. त्यामध्ये सुधारणा होऊ लागली. आपल्या धर्मातील दोष नष्ट करण्यासाठी व समाजजागृती करण्यासाठी 'विविध ज्ञानविस्तार' या सारखी नियतकालिके काढण्यात आली. या सर्वांचा परिणाम तत्कालिन लेखकांच्या मनावर होणे अपरिहार्य होते. एकोणिसाव्या शतकातील बहुतांश, वाङ्‌मय या सामाजिक विचाराने भरुन गेले आहे. आत्मचरित्रपण अशा व्यक्तिनिष्ठ वाङ्‌मयावरही याचा परिणाम झाला. त्याला ही सामाजिकतेचे स्वरुप प्राप्त झाले. 'दादोबा पांडुरंग' व 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' एकोणिसाव्या शतकातील ही दोन आत्मचरित्रे याची साक्ष देतात

मराठी साहित्यात आत्मचरित्रपर लेखनाची पाऊलवाट दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी निर्माण केली. त्यांच्या आत्मचरित्रात तत्कालीन बदलत्या समाजजीवनाचा इतिहास आला आहे असे म्हणावयास हरकत नाही. या आत्मचरित्रातून तत्कालीन जीवनातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व शैक्षणिक घडामोडींची त्रोटक माहिती मिळते.

दादोबांच्या आत्मचरित्र लेखनामागची भूमिका लोक कल्याणाची आहे. त्यांनी आपले सर्व विचार लोकहितार्थ लिहून ठेवले आहेत. दादोबा हे सामाजिक कार्यकर्ते असल्यामुळे तत्कालीन समाजा मध्ये ज्या घडामोडी होत होत्या त्यांचा इतिहास त्यांनी आपल्या आत्मचरित्राच्या रूपाने लिहून ठेवला आहे. या समाजातील रूढी, परंपरा, संकेत, श्रध्दा इत्यादींचे स्थूल मानाने दर्शन या आत्मचरित्रात होते. त्याचप्रमाणे आपल्या सहवासात आलेल्या व्यक्तींचे चित्रणही दादोबांनी केले आहे. तीर्थक्षेत्रे, स्थळे यांचे वर्णनही त्यांत येते. दादोबांनी आपल्या कुलवृत्ताविषयी व जन्माविषयी थोडक्यात माहिती सांगून नंतर बाळपणातील काही आठवणी सांगितल्या आहेत. या आत्मचरित्रावरून तात्कालीन शिक्षण - पध्दतीचे स्वरूप कळण्यास बरीच मदत होते.

या आत्मचरित्राचे स्वरूप वस्तुनिष्ठ निवेदनाचे आहे; त्यात एकांगीपणा नाही. किंवा भावनेचे रंग नाहीत. त्यामुळे अर्थातच लालित्यही आलेले नाही. तात्पर्य दादोबांचे आत्मचरित्र म्हणजे एकोणिसाव्या शतकातील समाज जीवनाचे दर्शन बाळबोधरूपाने घडविणारे आत्मपर लेखन होय. दादोबांचे हे आत्मचरित्र विशिष्ट काळापुरतेच मर्यादीत आहे.

दादोबांनी केलेली व्यक्तिचित्रणे ही तितकीशी उठावदार वाटत नाहींत. दादोबा यांच्या विषयीही केवळ माहिती देत जातात. त्यामुळे अनेकदा ती केवळ माहिती वजा होतात. जिवंतपणाचा त्यात अभाव राहतो. तात्पर्य, दादोबांना आपल्या वैयक्तिक जीवन चित्रित करण्यापेक्षा तत्कालीन बदलत्या समाजाचा इतिहास रेखाटण्यामध्ये अधिक रस आहे. हा इतिहास उत्तरकालीन जीवनात आठवणींच्या रुपानें लिहिला आहे त्यामुळे या पुस्तकाचे स्वरुप स्थूल माहितीवजा ग्रंथ असे बनते. पण दादोबांच्या व्यक्तिमत्वातील प्रांजळपणा, निरागसपणा आणि बालबोध लेखनपध्दती यामुळे हे लेखन स्मरणात राहते.

' आमच्या आयुष्यातील काही आठवणी ' हे रमाबाई रानडे यांचे आत्मचरित्र म्हणजे एकोणिसाव्या शतकातील एक सर्वोत्कृष्ट ग्रंथ म्हणावयास हरकत नाही. हे आत्मचरित्र लिहिण्यामागची रमाबाईंची भूमिका ही आपल्या पतीचे ( न्या. रानडे ) जीवनचित्र रेखाटण्याची आहे. न्या. रानडे हे महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत होते. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रीय व भारतीय जीवनात ज्या चळवळी झाल्या जे बदल झाले त्या सर्वांवर न्या. रानडे यांच्या विचारांचा व कर्तृत्वाचा ठसा उमटला आहे. अशा या थोर विचारवंताच्या सहवासात रमाबाईंनी त्यांची धर्मपत्नी म्हणून आपल्या आयुष्याची २७ वर्षे घालविली. या २७ वर्षांचा उभयतांच्या जीवनाचा इतिहास त्यांनीं या आत्मचरित्राच्या रुपानें आपल्या समोर ठेवला आहे. त्यांचा मुख्य उद्देश आपल्या पतीचे जीवनचित्र रेखाटण्याचा असला तरी, न्या.रानडे तत्कालीन सामाजिक जीवनाशी इतके एकरुप झाले होते कीं, त्यांचे जीवन त्या समाजजीवनापासून वेगळे करणे शक्य नव्हते. त्याच प्रमाणे

रमाबाई रानडे यांनी आपले सर्व आयुष्य स्त्रीसुधारणा व स्त्रीजातीमध्ये जागृती करण्यासाठी घालविले. त्यामुळे त्यांच्या आत्मचरित्रात तत्कालीन सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व सांस्कृतीक जीवनाची चर्चा अपरिहार्यपणे आली आहे. तत्कालीन समाजजीवनाचे दर्शन रमाबाईंच्या आत्मानुभावातून प्रगट झाले आहे.

आपल्या पतीवरील प्रगाढनिष्ठा व अपार प्रेम यामुळे या " आठवणी " ना कलात्मकतेचे रूप प्राप्त झाले आहे. या आत्मचरित्रात रमाबाईंच्या पतिनिष्ठेचे व सेवावृत्तीचे हृदयंगम चित्र पाहावयास मिळते. आमच्या आयुष्यातील काही आठवणी हे जसे रमाबाईचे आत्मचरित्र आहे, तसे ते न्या. रानडे यांचे चरित्र आहे. न्या. रानडे यांच्या जीवनांत रमाबाईंनी केलेल्या आत्मलेखामुळे या आत्मचरित्रात न्या.रानडे यांच्या चरित्राचाच वरचष्मा झाला आहे.

रमाबाईंच्या आत्मचरित्राच्या पहिल्या भागात रानडे घराण्याचा पूर्ववृत्तांत आला असून न्या. रानडयांच्या बालपणाचे वर्णन आले आहे. या नंतर रानडे यांना नोकरीसाठी अनेक ठिकाणी जावे लागले त्यावेळी या उभयतांना आलेले अनुभव रानडे यांचा शांत, समंजस स्वभाव रमाबाईंचा व रानडे यांचा सार्वजनिक कार्यातील सहभाग त्यावेळी त्यांना आलेले विविध अनुभव या सर्वाचे नंतरच्या भागात आलेले आहे. स्त्री शिक्षणाबद्दल तत्कालीन समाजातील कल्पना व तत्कालीन सामाजिक परिस्थिती याचेही दर्शन येथे घडते. मुंबई येथील प्लेगाची साथ हिंदु प्लेग हॉस्पिटल याचे रमाबाईंनी केलेले वर्णन अंतःकरणाला स्पर्शणारे आहे. ' करमाळयाचे दुखणे ' रमाबाईचे ऑपरेशन ' शेवटचा दिवस ' ( माधवरावांचा अंत ) इत्यादी प्रसंग अत्यंत करूण व दुःसह्य वाटतात रमाबाई कोणत्याही प्रसंगाचे चित्रण करताना तान्याशी एकरूप होत

असतात. त्यामुळे त्यांच्या संपूर्ण आत्मचरित्रात भावनेचा ओलावा आढळतो. माधवरावांच्या प्रमाणेच या संपूर्ण आत्मचरित्रात रमाबाईंच्या रूपाने एका वत्सल मातेचे चित्र पाहावयास मिळते.

रमाबाईंची भाषा साधी, सोपी व सरळ आहे. ती वाचकांच्या अंतःकरणाला भिडणारी आहे. रमाबाई कोणतेही व्यक्तिचित्रण उठावदारपणे रंगवतात त्यात शालीनता असते. त्यांचे शांत आणि प्रसन्न व्यक्तिमत्व या सर्वांतून पाहावयास मिळते.

रमाबाईंनी आपल्या कार्याची सुरवात ' सेवासदन ' ही संस्था स्थापन करून केली, मुंबई आणि पुणे येथे या संस्थेच्या शाखा काढण्यात आल्या त्या संस्थेच्या स्थापनेपासून आपल्या अंतापर्यन्त त्या या संस्थेच्या अध्यक्षा होत्या. या संस्थे मार्फत स्त्रीयाना शिक्षण देणे, मुलींसाठी वसतिगृहे चालविणे त्यांच्या मधील पूर्वग्रह काढून, लेखन, वाचन व भाषण या विषयीची आवड निर्माण करणे इत्यादी कामे केली जात. पतीवियोगा नंतरचे २४ वर्षांचे उर्वरीत आयुष्यही रमाबाईंनी स्त्रियांच्या उन्नतीसाठीच खर्च केले. त्यामुळे रमाबाईंच्या व्यक्तिगत जडणघडणीची जशी या आत्मचरित्रातून ओळख होते, तशीच १९ व्या शतकांतील उतरार्ध आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील दोन दशके या काळातील सामाजिक जीवन समजण्यासही मदत होते. हे आत्मचरित्र वास्तवजीवनाचे चित्रण करणारे आहे. अशा प्रकारे ' दादोबा पांडुरंग ' व ' आमच्या आयुष्यातील काही आठवणी ' या दोन आत्मचरित्रावरून तत्कालीन सामाजिक जीवन समजून घेण्यास बरीच मदत होते. मराठीतील सुरवातीच्या आत्मचरित्राचे स्वरूप

कसे होते, हे ही या दोन आत्मचरित्रावरुन समजून येते. मराठीत गद्य आत्मचरित्राच्या आणि स्त्री सुधारणेच्या प्रारंभ काळातच 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' सारखे वाङ्मयगुण संपन्न आत्मचरित्र लिहिले जावे ही गोष्ट लक्षणीय म्हंटली पाहिजे.